# सिद्धिविनायक ते दादर १.१२ किमी लांब भुयारीकरणाचा टप्पा अखेर पूर्ण

■ लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो-३ अंतर्गत कृष्णा-१ या टनेल बोरिंग मशीनद्वारे सिद्धिविनायक ते दादर हा १.१२ किमी लांब ३५वा भुयारीकरणाचा टप्पा पूर्ण करण्यात आला आहे.

७ जुलै २०२० रोजी या टप्प्याचे काम सुरू करण्यात आले होते. या भुयारीकरणासह पॅकेज-४चे एकूण १०.९६ किमी लांबीचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे. यासाठी ३ टनेल बोरिंग मशीन कार्यरत होत्या, अशी माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे देण्यात आली.

दुसरीकडे दादर मेट्रो स्थानकाचे जवळपास ४२ टक्के काम पूर्ण झाले आहे. दरम्यान, आता एकूण ७ पैकी ४ पॅकेजेसमध्ये भुयारीकरण १०० टक्के पूर्ण झाले आहे.

भुयारीकरण आव्हानात्मक काम आहे. शहराचे मुख्य केंद्र मानले जाणारे दादर, मेट्रो-३द्वारे जोडले जाईल. मुंबईकरांच्या अडचणी कमी होतील, अशी माहिती मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल यांनी दिली.



मेट्रो-३ चे काम वेगाने सुरू आहे.

- दादर, सिद्धिविनायक, शीतलादेवी या स्थानकांचा समावेश आहे.
- ८ भुयारीकरणाचे टप्पे पूर्ण करण्यात आले.
- नयानगर ते धारावी (अपलाइन - ५८९ मी. आणि डाउनलाइन - ५८९ मी.)
- नयानगर ते दादर (अपलाइन - २४९१ मी. आणि डाउनलाइन - २४७२ मी.)
- सिद्धिविनायक ते दादर (अपलाइन - ११०६ मी. आणि डाउनलाइन - ११२६ मी.)
- सिद्धिविनायक ते वरळी (अपलाइन - १३०५ मी. आणि डाउनलाइन - १२८४ मी.)